पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता.फुलंब्री जि.औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- २०१७-२०१८

## महिला सबलीकरण समिती

प्राचार्य
डॉ.एस.आर .टकले

विभाग प्रमुख
डॉ.मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## वार्षिक अहवाल २०१७-२०१८

## महिला सबलीकरण समिती

महिला सबलीकरण समितीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१७- २०१८ मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

### महिला आरोग्य तपासणी शिबीर:-

महिला शारिरिक दृष्टया सक्षम असल्या शिवाय स्वत:चा विकास करु शकत नाहीत हे उद्यीष्ट डोळयासमोर ठेवून महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या आरोग्य तपासणीसाठी दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. फरीन पठाण, डॉ. ताठे, डॉ. सिकंदर इत्यादी चे पथक आले होते. प्रथमत: आलेल्या सर्व डॉक्टरांचे परिचारकांची ओळख करुन देण्यात आली व त्यांचे स्वागत करण्यात आले. स्वागत परिचयाच्या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. शिबीराच्या उद्‌घाटनानंतर मुलींची तपासणी वेगळया कक्षात करण्यात आली. डॉ. फरीन यांनी मुलींना आरोग्य व आहार विषयक माहिती सांगितली. तसेच मुलींच्या प्रश्नांचे निरसण केले. महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या आरोग्याची तपासणी करून त्यांना व्हिटॅमिनच्या गोळ्या देण्यात आल्या. सदरील आरोग्य तपासणी शिबीरात ३५ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

### सावित्रीबाई फुले जयंती:-

सावित्रीबाई फुले जयंती निमित्त दिनांक ३ जानेवारी २०१८ रोजी सामुहिक अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

### जागतिक महिला दिन:-

जागतिक महिला दिन निमित्त दिनांक १२ मार्च २०१८ रोजी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शासकीय महाविद्यालयातील डॉ. प्रमिला भुजाडे यांनी **महिला सबलीकरणात समाजाची भूमिका** या विषयावर मार्गदर्शन केले.सदरील मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, महिलांच्या पाठिशी समाज जोपर्यंत खंबीरपणे उभा राहणार नाही. तोपर्यंत महिला सक्षम होणार नाहीत. समाजाने व आपण प्रत्येकाने महिलांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत त्यांना शैक्षणिक व आर्थिक विकासाची संधी मिळवून द्यावी. सदरील कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केला.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

# महिला सबलीकरण समिती

## कार्यक्रमाची छायाचित्रे

शैक्षणिक वर्ष २०१७-१८

---

### महिला आरोग्य तपासणी शिबीर




शिबीरासाठी आलेल्या डॉक्टररांच्या चंमुचा परिचय करुन देतानां डॉ. नळगीरकर मॅडम.



डॉक्टर फरीण पठाण विद्यार्थ्यानीनां आरोग्य व आहारा विषयी मार्गदर्शन करतांना.




डॉक्टर फरीण पठाण विद्यार्थ्यानीची आरोग्य तपासणी करतांना.

# सावित्रीबाई फुले जयंती




सावित्री बाई फुले यांच्या जयंती निमीत्त प्रतिमापूजन व अभिवादनाचा कार्यक्रम

## जागतिक महिला दिन




डॉ.प्रमिला भुजाडे ''महिला सबलीकरणात समाजाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करतांना

## बातमी प्रसिध्दी

## दै.दिव्य मराठी दि. २४/०९/२०१७

### तरुणांचे शरीर, मन आणि विचारच देशाला सुदृढ बनवेल : डॉ. ताटे

प्रतिनिधी । फुलंब्री

तरुणांचे शरीर, मन आणि विचारच देशाला सुदृढ बनवू शकतात. परिणामी देश प्रगती करेल, देश महासत्ता होईल, असे प्रतिपादन डॉ. सुरेश ताटे यांनी फुलंब्री येथे शनिवारी (ता. २३) आरोग्य तपासणी शिबिराप्रसंगी केले.



श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय आणि फुलंब्री आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिर झाले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ताटे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. शिबिरात १५२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ. ताटे म्हणाले की, तरुणाचे शरीर, मन आणि विचारच देशाला सुदृढ बनवू शकतात. म्हणून निःसंकोचपणे आपण आपली आरोग्याची तपासणी वेळोवेळी करून घ्यावी व सबळ आणि निरोगी व्यक्ती म्हणून सर्वांपुढे यावे. तरुणांनी कायम व्यायाम करावा. प्राणायाम, योग करावा. तसेच सुदृढ मनासाठी विविध विषयांवरील पुस्तके वाचून आपले ज्ञानभांडार वाढवावे. त्यामुळे शरीर आणि मन दोन्हीही सक्षम होईल. याप्रसंगी फुलंब्रीतील शासकीय आरोग्य विभागाचे डॉ. सिकंदर शेख, डॉ. फरीन सय्यद, डॉ. संकेत चोबे, डॉ. संध्या मुंढे, डॉ. लीला वाणी यांनी आरोग्य तपासणी केली. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. संदीप जगताप यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.